Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 04/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## प्रसिद्ध पार्श्वगायक, अभिनेता किशोर कुमार



किशोर कुमार हे पार्श्वगायक, गायक, अभिनेता, गीतकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथालेखक होते. हिंदी व्यतिरिक्त, त्यांनी बंगाली, मराठी, आसामी, गुजराती, कन्नड, भोजपुरी, मल्याळम, आणि उर्दू यासह अनेक भारतीय भाषांमध्ये गायन केले आहे. त्यांचा जन्म ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्य प्रदेशातील खांडवा या गावी झाला. त्यांचे नाव आभास कुमार ठेवण्यात आले. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते, आई गौरीदेवी या एका श्रीमंत घराण्यातील होत्या. किशोर कुमार आपल्या भावंडात सर्वात लहान होते. भाऊ अशोक कुमार बॉलीवुडमध्ये प्रसिद्ध झाल्यावर, गांगुली परिवाराचे मुंबई दौरे वाढत गेले.

आभास कुमार यांनी याच वेळी आपले नाव किशोर कुमार ठेवून आपल्या फिल्मी कारकीर्दीला सुरुवात केली. बॉम्बे टॉकीजमध्ये ते समूहगायक म्हणून काम करीत. अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट शिकारी (इ. स. १९४६) होता. या चित्रपटात अशोक कुमार यांची प्रमुख भूमिका होती. संगीतकार खेमचंद प्रकाश यांनी किशोर कुमार यांना जिद्दी (इ. स. १९४६) या चित्रपटासाठी गाण्याची संधी दिली. हे गाणे होते मरने की दुआएँ क्यों मांगूँ. यानंतर किशोर कुमार यांना गाण्याच्या बऱ्याच संधी मिळाल्या. इ. स. १९४९ साली त्यांनी मुंबईत राहण्याचे निश्चित केले.बॉम्बे टॉकीजच्या फणी मजूमदार दिग्दर्शित आंदोलन (इ.स. १९५१) या चित्रपटात त्यांनी हिरोचे काम केले. त्यांची गायकीची कला दाखविण्याचे श्रेय संगीतकार एस. डी. बर्मन यांना जाते. पडोसन चित्रपटातील किशोर कुमार, सुनील दत्त आणि मेहमूद यांच्यातील संगीत आणि विनोदी द्वंद्व या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे. एक चतुर नार करके सिंगार हे त्यातील गीत खूप गाजले. किशोर कुमार यांचे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी मुंबईत निधन झाले.

Nashik Edition

Aug 04, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401